महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक : डब्ल्युईबी-१०२०/सी.आर.२६/२०२१/तेवीस दिनांक : १७ सप्टेंबर, २०२१

# -: प्रसिध्दीपत्रक :-

विषय :- राज्यसेवा मुख्य परीक्षा- २०१९ च्या पसंतीक्रमाबाबत

राज्यसेवा मुख्य परीक्षा २०१९ च्या लेखी परीक्षेचा निकाल दिनांक १४ जानेवारी, २०२० रोजी व सुधारित निकाल दिनांक ६ ऑगस्ट, २०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे. सदर निकालास अनुसरुन राज्यसेवा परीक्षेमधून भरावयाच्या विविध संवर्गाकरीता पसंतीक्रम सादर करण्याकरीता दिनांक १२ ऑगस्ट, २०२१ ते २३ ऑगस्ट, २०२१ या कालावधीत वेबलिंक सुरु करण्यात आली होती. सदर कालावधीत आयोगाच्या सुचनेनुसार पदांचे पसंतीक्रम सादर न केलेल्या उमेदवाराकरीता करावयाच्या कार्यवाहीसंदर्भात दिनांक ८ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या घोषणेद्वारे कार्यपध्दती विहित करण्यात आली होती.

**२.** आयोगाच्या दिनांक ८ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या घोषणेद्वारे विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीस अनुसरुन आयोगाकडे व्यापक प्रमाणावर प्राप्त झालेली विविध अभिवेदने, दरम्यानच्या कालावधीत मुलाखत दिलेल्या उमेदवारांची अन्य पदावर निवड झाली असण्याची शक्यता व या संदर्भातील असाधारण परिस्थिती विचारात घेऊन या पूर्वीच्या दिनांक १२ ऑगस्ट, २०२१ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकानुसार पदांचे पसंतीक्रम सादर केलेल्या तसेच पदांचे पसंतीक्रम सादर न केलेल्या सर्व उमेदवारांना प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या कोणत्याही संवर्ग/ पदाकरीता पसंतीक्रम नाही (Opting Out) असा विकल्प निवडण्याकरीता पुन्हा वेबलिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे. अशा प्रकारे जे उमेदवार प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या कोणत्याही संवर्ग/पदाकरीता पसंतीक्रम नाही (Opting Out) असा विकल्प देतील, अशा उमेदवारांचा विचार प्रस्तुत परीक्षेच्या अंतिम निवडसूचीत करण्यात येणार नाही व अशा उमेदवारांची शासनाकडे शिफारस करण्यात येणार नाही. त्यानुसार यासंदर्भात ज्या उमेदवारांना विकल्प द्यावयाचा आहे, त्यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी :-

(१) आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील ONLINE FACILITIES मधील Post Preference या लिंकवर क्लिक करावे.

(२) उपलब्ध होणा-या परीक्षांच्या यादीमधून राज्यसेवा मुख्य परीक्षा- २०१९ परीक्षेची निवड करावी.

(३) परीक्षेच्या अर्जात नमूद मोबाईल क्रमांक नमूद करुन सदर क्रमांकावर प्राप्त होणारा ओटीपी प्रविष्ट करुन लॉगीन करावे.

(४) कोणत्याही संवर्ग/पदाकरीता पसंतीक्रम देण्यास इच्छुक नसणा-या उमेदवारानेच उपलब्ध नमुन्यामध्ये पदांचा पसंतीक्रम नाही हा विकल्प निवडावा.

(५) प्रस्तुत प्रसिद्धीपत्रकानुसार विहित कालावधीमध्ये पदांचा पसंतीक्रम नसल्याबाबत विकल्प सादर करणा-या उमेदवारांकरीताच सदर निर्णय लागू राहील.

**३.** पसंतीक्रम सादर करण्याकरीता सदर वेबलिंक दिनांक १७ सप्टेंबर, २०२१ रोजी सायंकाळी १७.०० पासून दिनांक २० सप्टेंबर, २०२१ रोजी २३:५९ वाजेपर्यंत सुरु राहील.

ठिकाण :- मुंबई

सह सचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग